ePaper
पिंपरी चिंचवडकरांना गर्मीतून काहीसा दिलासा, तापमान 35 अंशावर



|| वर्ष - 7 । अंक - 336 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- माझा बाप बिल्डर असता तर?
- निगडी मेट्रोच्या कामाला सुरूवात!
- टेंडरबाज मंत्र्यांचा प्रताप!
- कोरबो-लोरबो जीतबो!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 27 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## बारामतीमधील नेत्यांची अस्वस्थता चर्चेचा विषय

# निकालापूर्वीची धास्ती; नेत्यांच्या झोपा उडाल्या!

### मताधिक्य कमी झाल्यास अजित पवारांच्या रडारवर येण्याची नेत्यांना भीती

। पुणे । महाईन्यूज

**पुणेः बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. या मतदारसंघात पवारविरुद्ध पवार, अशी लढत झाली. निकालाच्या धास्तीने उपमुख्यमंत्री अजित पवार गटातील स्थानिक नेत्यांची झोप उडाली आहे. मताधिक्य कमी झाल्यास अजित पवार यांच्या रडारवर येण्याची भीती नेत्यांमध्ये आहे. बारामतीमधील नेत्यांची ही अस्वस्थता चर्चेचा विषय ठरली आहे.**



राष्ट्रवादी फुटल्यानंतर अजित पवार यांनी महायुती सहभागी होत राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. शरद पवार यांच्याकडून पक्ष आणि पक्षचिन्ह दोन्ही गेले. निवडणूक आयोगाने ते अजितदादांना दिले. यातच लोकसभेच्या निवडणुका लागल्या. शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष आणि तुतारी वाजवणारा माणूस, असे पक्षचिन्ह घेत बारामती लोकसभा मतदारसंघात दहा लोकसभा मतदारसंघात उमेदवार दिले. बारामतीतून खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांनी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले.

बारामतीवर शरद पवार यांच्यासह अजित पवार यांचे वर्चस्व. त्यामुळे ही लढत कशी होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले. बारामतीची निवडणूक चुरशीची झाली. अजित पवार यांच्याविरोधात सर्व पवार कुटुंब, अशी स्थिती निवडणुकीत पाहायला मिळाली. त्यामुळे पवारविरुद्ध पवार, असा सामना या मतदारसंघात रंगला होता. लोकसभेचा निकाल चार जूनला आहे. निकाल काय लागणार याची उत्सुकता आहे. परंतु बारामतीमधील नेत्यांची झोप उडाली आहे. पवारविरुद्ध पवार सामन्यांत त्यांची कोंडी झाली आहे. यातच अजित पवार यांनी बारामतीत येऊन 19 मे रोजी गावातील नेत्यांकडून मतदान कसे झाले, याचा आढावा घेतला आहे.

अजित पवार यांचे बारामतीवर एकहाती वर्चस्व आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्थांवर त्यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत या संस्थेतील नेते आणि पदाधिकाऱ्यांवर अजित पवार यांची मोठी भिस्त आहे. घड्याळाला मतदान घडवून आणण्याची जबाबदारी अजित पवार यांच्याकडून देण्यात आली होती.

### अजितदादांच्या रडारवर कोण कोण?

निकाल काही दिवसांवर आल्यामुळे या नेत्यांच्या झोपा उडून अस्वस्थता पसरली आहे. कमी मताधिक्य मिळाल्यास नेत्यांना खुर्ची जाण्याची भीती आहे. तशी अजितदादांकडून तंबी देखील देण्यात आली होती. ही निवडणूक मतदारांनी हातात घेतल्याचे चित्र होते. त्यामुळे नेत्यांच्या गावातून किती मतदान झाले. घड्याळाला किती मताधिक्य मिळाले. त्यानुसार खुर्ची आणि पद राहणार की, जाणार अशी चर्चा रंगली आहे. निकालानंतर अजितदादांच्या रडारवर कोण कोण? अशी चर्चा रंगली आहे.

---

## ६ जूननंतर आमच्याकडे इनकमिंग सुरू होणार!

### आमदार संजय शिरसाटांचा दावा; विधानसभा निवडणुकीचे वेध

। मुंबई ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सर्वांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागणार आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात पक्षांतर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे.**



राज्यात सध्या सर्वांचं लोकसभा निवडणुकीच्या निकालाकडे लक्ष आहे. राज्यातील महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात खरी लढत होती. त्यामुळे महाराष्ट्रातून दिल्लीत कोणाचे सर्वाधिक खासदार जाणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सर्वांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागणार आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात पक्षांतर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे.

संजय शिरसाट म्हणाले, "६ जूननंतर आमच्याकडे इनकमिंग सुरू होईल. त्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या संपर्कात अनेकजण आहेत. माझ्याही संपर्कात आहेत. आमच्याच नियमित चर्चाही होतेय. योग्यवेळेला योग्य निर्णय घेण्याची शिंदेंची स्ट्रॅटेजी आहे. त्यानुसार ते निर्णय घेतील.

दरम्यान, या काळात अजित पवार यांच्याकडेही मोठ्या प्रमाणात इनकमिंग होणार असल्याचे सूतोवाच त्यांनी दिले आहेत. ते म्हणाले, "अजितदादांकडेसुद्धा अनेकजण येणार आहेत. कारण, आता शरद पवार गटाला कंटाळले आहेत. त्या गटात चाललेली हुकूमशाही, मीपणा आणि अहंभाव यामुळे आमदार कंटाळले. ते अजित दादांच्या संपर्कात आहेत."

### विधानसभा निवडणुकीचे वेध

२० जून २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदे त्यांच्या काही आमदारांसह बाहेर पडले. त्यांच्या गटाला निवडणूक आयोगाने मूळ शिवसेनेचा दर्जा दिला. बरोबर वर्षभराने म्हणजेच १ जुलै रोजी अजित पवारांनी राष्ट्रवादीत बंड करून सत्ताधारी पक्षाला समर्थन दिलं. यामुळे राष्ट्रवादीतही दोन गट निर्माण झाले. परिणामी राज्यात मोठ्या प्रमाणात सत्तासंघर्ष निर्माण झाला. या सत्तासंघर्षामुळे लोकसभा निवडणूक चुरचीशी ठरली. ऐनवेळी अनेक इच्छूक उमेदवारांनी पक्षांतर केलं. त्यांच्याबरोबर अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारीही गेले. आता विधानसभा निवडणुकीतही तेच होणार असल्याची शक्यता आहे. राज्यातील आगामी विधानसभा निवडणूक प्रचंड चर्चेची आणि हायवोल्टेज राहणार आहे. त्यामुळे कोणत्या पक्षात कोण जाणार याकडे सर्वांचं लक्ष आहे.

# माझा बाप बिल्डर असता तर?

## युवक काँग्रेसकडून निबंध स्पर्धेचं आयोजन, तरुणांनी शब्दातून व्यक्त केला रोष

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात ज्याठिकाणी मद्यधुंद अवस्थेत एका बिल्डरपुत्रानं दोघांना चिरडलं त्याचठिकाणी काँग्रेस राज्यस्तरिय खुली निबंध स्पर्धा लिहून व्यवस्थेचा उपरोधिकपणे निषेध नोंदवला. अनेकांनी या निंबध स्पर्धेच्या आंदोलनात सहभागी होऊन निषेध व्यक्त केला. आणि उत्तम निबंध लिहिणाऱ्याला ११ हजारांचं पारितोषिकही ठेवलं गेलं. निंबधांचे विषय होते, माझा बाप बिल्डर असता तर....?, विषय दुसरा- मी खरंच पोलीस अधिकारी झालो तर...?, विषय तिसरा- माझी आवडती कार (पोर्शे, मर्सिडिज, फरारी की इतर?), विषय चौथा- दारुचे दुष्परिणाम, विषय पाचवा- अश्विनी आणि अनिशचे मारेकरी कोण?.**



19 मे रात्री मद्यधुंद अवस्थेत बिल्डर विशाल अग्रवालच्या मुलानं दोन तरुणांना चिरडलं. अपघातावेळी बिल्डरपुत्राची पोर्शे कारचा वेग ताशी २०० किलोमीटर होता. याप्रकरणात पोलिसांनी जाणून-बुजून आरोपीची सुटका होईल, अशी कलमं लावल्याचा आरोप झाला. कोर्टानं अल्पवयीन आरोपीला अपघातावर ३०० शब्दात निबंध लिहिण्याची शिक्षा ठोठावून सुटका केली. यावरुनच सामान्य लोकांनी मोठा संताप व्यक्त करत मोहिम उघडली. परिणामी यंत्रणेवर दबाव वाढला, आणि आरोपीची रवानगी पुन्हा बालसुधारगृहात करावी लागली. बड्या बापाचा मुलगा फक्त 2 महिन्यांनी अल्पवयीन आहे म्हणून दोघांना चिरडल्याची शिक्षा फक्त 300 शब्दात निबंध लिहिण्याची असू शकते का? यावरही प्रश्न उभे राहिले.

अभिनेता ऋषीकेश जोशीनं म्हटलं की, किमान निबंधात कमी मार्क मिळाल्यास तरी तुरुंगात घालण्याचा एखादा कायदा करायला हवा. कुणी म्हटलं की तो ३०० शब्दातला निबंधही एखाद्या सरकारी कर्मचाऱ्यानेच लिहून दिला पाहिजे. इतकी कठोर शिक्षा त्या बिचाऱ्याला देणं अन्याय ठरेल. काहींनी म्हटलं की ही खरोखर 2 जणांना गाडीखाली चिरडल्याची शिक्षा आहे की मग उन्हाळ्यातील सुट्टीचा अभ्यास? तर कुणी बॅनर लिहून पुण्यात अपघातास मनाई नाही, फक्त अपघाताआधीच ३०० शब्दातील निबंधाचा कागद गाडीत ठेवावा, असं आंदोलन केलं.

कायदा कायद्याचं काम करतो. मात्र अशा घटनांमधल्या विसंगतीवरुन लोकांचा संताप उफाळून येतो. म्हणजे जेव्हा बिल्डरपुत्रानं एक तरुण आणि तरुणीला चिरडलं, तेव्हा त्यांच्या नातलगांना शवविच्छेदन करुन मृतदेहही मिळाले नव्हते. त्याच्याआधी आरोपीची सुटका झाली होती. दुसरी गोष्ट म्हणजे अपघातानंतर दोन्ही मृतदेहांचं शवविच्छेदन झालं, त्यांचे मृतदेह त्यांच्या मूळगावी म्हणजे मध्य प्रदेशातल्या जबलपूर पोहोचले. त्यांचा अंत्यविधीही झाला. आज घटनेला ८ दिवसही लोटले. पण अद्यापही आपल्या पुणे पोलिसांना आरोपीच्या रक्ताचे ब्लडरिपोर्ट मिळवता आलेले नाहीत. जेव्हा व्यवस्थाच सामान्यांचा उपरोध करते, तेव्हा त्यालाही उत्तर उपरोधानंच दिलं पाहिजे, अशी प्रतिक्रिया निबंध लिहणाऱ्या पुणेकरांची होती.

### पुणेकरांची प्रतिक्रिया काय?

सोशल मीडियात लोकांनी सामान्य लोकांना आवाहन केलं की, सामान्यांनी रस्त्यावरुन सुरक्षित चालावं. नाहीतर तुमच्यामुळे कुणाचा तरी बहुमुल्य वेळ निबंध लिहिण्याच्या शिक्षेनं बर्बाद होऊ शकतो. लोकांनी विजय मल्ल्याचा फोटो ट्विट करुन म्हटलं की, मी सुद्धा पुण्याच्या धर्तीवर भारतात परतायला तयार आहे. फक्त मलाही ३०० शब्दात ‘कर्ज कसं माफ करावं’ यावर निबंध लिहिण्याची शिक्षा मिळावी.

# दौंड तालुक्यातील गिरिम येथील तरुणाची कमाल

## राज्यातील पहिलाच प्रयोग; गुळाच्या कुल्फीची साऱ्यांनाच भुरळ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही वर्षात गुळाचा चहा महाराष्ट्राच्या विविध भागात चांगलाच प्रसिद्ध झाला. खरंतर ७० ते ७५ वर्षांपूर्वी पर्यंत शक्यतो गुळाचा चहा व्हायचा. कारण साखरेचे कारखाने त्यावेळेस प्रचलित नव्हते. पण दुधात गुळ टाकला की दूध नासतं हे गणित साऱ्यांनाच माहीत आहे, पण हे गणित ज्याने बिघडवण्याच्या ऐवजी घडवलं. तिथली रेसिपी कायमची चर्चेत राहिली. त्यामुळेच गेल्या काही वर्षात गुळाचा चहा चांगलाच फेमस झाला आहे. तो साऱ्यांना जमतो.. असं नाही मात्र ज्यांनी यामध्ये काही कल्पना प्रचलित आणल्या आणि त्यातून व्यवसाय केला आणि तो यशस्वी होत आहे.**





उन्हाळा सुरू झाला की, सर्वांचीच पावलं वळतात ती रसवंती गृहाकडे किंवा आईस्क्रीम पार्लरकडे. उन्हाळा सुरू झाला की, साऱ्यांच्या जीभा आईस्क्रीम किंवा कुल्फी खाण्यासाठी आसुसलेल्या असतात. अशा आसुसलेल्या चोखंदळ खवय्यांसाठी गावागावात कुल्फीचे गाडे किंवा शहरांमध्ये आईस्क्रीम पार्लर कार्यरत असतात. पण या सगळ्यांमध्ये आतापर्यंत असे थंड पदार्थ बनवण्यासाठी साखरेचा सर्रास वापर केला जात आहे.

मात्र दौंड तालुक्यातील गिरिम येथील किरण नेमाणे या युवा उद्योजकाने एक नवाच फंडा शोधला आहे. शेतकरी असलेल्या किरण मेमाने यांनी गेल्या काही वर्षांपासून कुल्फी बनवण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. मात्र आता या व्यवसायात नवा प्रयोग करताना त्यांनी गुळाची कुल्फी बाजारात आणली आहे. गुळाची कुल्फी हा नवीन प्रयोग का? तर दूध आणि गूळ यांचं मिश्रण अविट होत नाही. गुळाच्या चहामध्ये हा चहा काही वेळात संपवला जातो, परंतु कुल्फी ही एक-दोन दिवस राहू शकते. अशा वेळी या कुल्फीच्या मिश्रणातील गुळाचे दुधाचे प्रमाण आणि त्यांची चव बदलता कामा नये, ही तशी अवघड अभिक्रिया आहे, परंतु यातील चव कायम राहून ती अविट करण्याकडे नेमाणे यांनी लक्ष दिले आणि त्यांचा हा प्रयोग यशस्वी झाला आहे.

त्यांनी अनेक ठिकाणी याविषयी चौकशी केली. गुळाचा चहा बनवणे सोपे आहे, परंतु गुळाची कुल्फी बनण्यास अवघड आहे. अशा स्वरूपाची चर्चा त्यांना ऐकायला मिळाली, तसेच त्यांनी इतर ठिकाणी संशोधन करण्याचा प्रयत्न केला. मात्र दुधात गुळ टाकला की ते फुटते. दीर्घकाळ ठेवल्यानंतर तो पदार्थ व्यवस्थित राहत नाही, असे त्यांच्या लक्षात आले. याला कारण सध्या बाजारात जो गुळ आहे, त्याच्यामध्ये रसायनांचे प्रमाण जास्त आहे. दरम्यान २०० ते २५० गुऱ्हाळांना भेट दिली. तेथून अर्धा ते एक किलो प्रत्येक ठिकाणचा

### कुठे केलाय हा प्रयोग ?

दौंड तालुक्यात दौंड शहरापासून काही अंतरावर असलेल्या गिरिम या गावात किरण नेमाणे राहतात. तिथेच त्यांचा शेती आणि हा कुल्फी बनवण्याचा व्यवसाय आहे. ते दूध विकत घेतात आणि त्यापासून आत्तापर्यंत साखरेची कुल्फी बनवत होते. गेल्या दोन वर्षापासून त्यांचा हा व्यवसाय चांगला चालला होता. मात्र सातत्याने ग्राहकांना नवीन काहीतरी देण्याचा उद्देश आणि हा व्यवसाय आणखी वाढला पाहिजे.

# पिंपरी ते निगडी मेट्रोच्या कामाला सुरुवात!

## मेट्रोकामासाठी लोखंडी बॅरिकेड्स टाकून खोदकाम सुरू

| पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी या रखडलेल्या मेट्रोच्या कामाला अखेर शनिवार (दि.२५) सुरुवात झाली आहे. निगडी येथील टिळक चौकाजवळ मेट्रोकामासाठी लोखंडी बॅरिकेड्स टाकून खोदकाम सुरू झाले आहे. अनेक दिवसांपासून हे काम रखडले होते.**




पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यात पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहर यांना जोडणारी पिंपरी-चिंचवड महापालिका ते सिव्हील कोर्ट (शिवाजीनगर) या दरम्यान मेट्रोची प्रवासीसेवा सुरू झालेली आहे. सिव्हील कोर्टपासून स्वारगेटपर्यंत मेट्रोची प्रवासीसेवा अद्याप सुरू झालेली नाही. दरम्यान, स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड या मार्गिकेतील प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणार्या पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी (भक्ती-शक्ती चौक) या मार्गाच्या विस्तारीकरणाची निविदा महामेट्रोने लोकसभा निवडणूक आचारसंहितेपूर्वी प्रसिद्ध करून त्यासाठी मंजुरी घेतली होती. त्यानुसार, हे काम रेल विकास निगम लिमिटेड यांना देण्यात आलेले आहे.महामेट्रोने पुणे मेट्रो प्रकल्पाचे बांधकाम करताना पिंपरी-चिंचवडच्या मेट्रोची मार्गिकेचे बांधकाम एम्पायर इस्टेट उड्डाणपुलापर्यंत केले आहे. त्यामुळे येथून काही अंतरावरच चिंचवडच्या मुख्य चौकात विस्तारित मार्गाचे पहिले स्टेशन प्रस्तावित आहे. आकुर्डी येथील मेट्रोचे स्टेशन खंडोबा माळ चौकामध्ये प्रस्तावित आहे, तर निगडी येथील स्टेशन भक्ती-शक्ती चौकातील पीएमपीच्या बस थांब्याजवळ असेल. मेट्रोने पुढील वर्षाच्या सुरुवातीला प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करून गतीने काम पूर्ण केल्यास २०२५ च्या अखेरीपर्यंत हे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

### हा मार्ग साडेचार किलोमीटरचा असणार..

पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी (भक्ती-शक्ती चौक) या विस्तारित मार्गाला केंद्र सरकारने दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ रोजी मान्यता दिली. या मार्गाची एकूण लांबी ४.५१९ किलो मीटर आहे. या मार्गिकेचा एकूण खर्च ९१०.१८ कोटी इतका आहे. या संपूर्ण विस्तारित मार्गाचे काम ३ वर्षे आणि ३ महिन्यांत पूर्ण करण्याचे महामेट्रोचे नियोजन आहे. या मार्गिकेचे बांधकाम स्वीकृती पत्र मिळाल्यापासून १३० आठवड्यांत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

### पिंपरी-चिंचवडकरांची स्वप्नपूर्ती...



"पुणे-पिंपरी-चिंचवड मेट्रोचे काम पिंपरीपर्यंत ज्या वेगात सुरू आहे. त्याच वेगात निगडीपर्यंत होईल.." असे आश्वासन राज्याचे नेते तथा उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दिले होते. आज निगडीपर्यंतच्या मेट्रोच्या कामाला सुरूवात झाली. ही पिंपरी-चिंचवडकरांची खर्या अर्थाने स्वप्नपूर्ती आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची यानिमित्ताने आठवण झाली. मा. देवेंद्रजींनी दिलेला शब्द खरा ठरला. पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक प्रवासी वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाकांक्षी आहे. यासोबतच आगामी काळात हिंजवडी-वाकड-पिंपळे सौदागर- भोसरी-चाकण असा मेट्रो विस्तारासाठी प्रयत्नशील राहणार आहोत. तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने राज्य व केंद्रातील महायुती सरकारचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. **– महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### या मार्गावर चार स्थानके..

हा संपूर्ण मार्ग उन्नत आहे. या मार्गावर चिंचवड, आकुर्डी, निगडी आणि भक्ती-शक्ती चौक अशी ४ स्थानके असणार आहेत. महापालिका स्थानक ते चिंचवड स्थानकातील अंतर १.४६३ किमी आहे. चिंचवड ते आकुर्डी स्थानकातील अंतर १.६५१ किमी, आकुर्डी ते निगडी अंतर १.०६२ किमी आणि निगडी ते भक्ती-शक्ती चौक अंतर ९७५ मीटर असणार आहे. हे काम जलद गतीने पूर्ण होण्यासाठी व्हायाडक्ट बांधण्याबरोबरच ठेकेदाराला स्थानकाचे कोनकोर्स व फलाटाच्या स्लॅबचे काम करावे लागणार आहे. त्यामुळे स्थानकाच्या बांधणीचा वेळ वाचणार आहे.

---

# दुकानाचे शटर उचकटून २९ लाखांच्या दागिन्यांची चोरी

## सीसीटीव्ही कॅमेरे तोडून डीव्हीआर देखील पळवला

| पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शटर उचकटून चोरट्यांनी दुकानातून २९ लाखांचे सोन्याचांदीचे दागिनेचोरून नेले. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे तोडून नुकसान करून डीव्हीआर देखील लंपास केला. प्राधिकरण निगडी येथील पेठ क्रमांक २५ मधील श्रीलक्ष्मी ज्वेलर्स नावाच्या दुकानामध्ये शुक्रवारी (दि. २४) रात्री साडेनऊ ते शनिवारी (दि. २५) सकाळी साडेआठ वाजताच्या दरम्यान चोरीचा हा प्रकार घडला.**



संदीप छगनराव बुहाडे (५०, रा. प्राधिकरण, निगडी) यांनी याप्रकरणी निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्याच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संदीप बुहाडे यांचे प्राधिकर निगडीमध्ये श्रीलक्ष्मी ज्वेलर्स नावाचे दुकान आहे.

या दुकानाचे शटर अर्धवट वाकवून अर्धवट उघडे करून अज्ञात चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला. दुकानातील तिजोरी तोडून २० लाख रुपये किमतीचे ३०० ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच नऊ लाख रुपये किमतीचे १० किलो चांदीचे दागिने, १८ हजारांची रोकड तसेच दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा एक हजार रुपये किमतीचा डीव्हीआर चोरून नेला.

चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्ही कट करून नुकसान केले. तसेच फिर्यादी संदीप यांच्या दुकानाशेजारील इतर दुकानांचे सीसीटीव्ही देखील तोडून नुकसान केले. सहायक पोलिस निरीक्षक अंबरीश देशमुख तपास करीत आहेत.



# वाकड येथील अनधिकृत रूफटॉप हॉटेलवर हातोडा..!

| पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड येथील भुजबळ चौक-मधुबन हॉटेल शेजारी रस्त्यालगत असलेल्या दुसऱ्या मजल्यावरील आणि नव्वा मजल्यावरील अनधिकृत रूफटॉप हॉटेलवर शनिवारी (दि.२५) कारवाई करण्यात आली. दुसऱ्या मजल्यावरील स्पाइस फॅक्टरी, अब्सोल्यूट बार्बेक्यू आणि नवव्या मजल्यावरील पब्लिक हॉटेल यांच्यावर महापालिकेने कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये अंदाजे ९ हजार चौरस फुट क्षेत्रफळाचे अनधिकृत रुफटॉप पाडण्यात आले आहेत. ही कारवाई आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानुसार करण्यात आली. महापालिकेच्या 'ड' प्रभागाचे क्षेत्रीय अधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या नियंत्रणाखाली बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता भागवानी, उप अभियंता विजय भोजने, कनिष्ठ अभियंता अमोल पडलवार, सुहास भगत, ओंकार ताटे, शेषराव अटकुरे, अमोल शिंदे यांनी ही कारवाई पूर्ण केली.

# तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई !



भूमिका

**भिकू धुत्रे यांची मुलगी रमा व सुभेदार रामजी सकपाळ यांचे पुत्र भीमराव यांचा विवाह मुंबईतील भायखळा भाजीमंडीमध्ये झाला. त्यावेळी रमा 9 वर्षाची व भीमराव 14 वर्षाचे असतांना त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रुढ होती. समाजाने देखील मान्यता दिली होती. विवाह अत्यंत साध्या पध्दतीने पार पडला. रमा लहान असतांनाच आई व वडीलांचे छत्र हरपले होते.**

तेव्हा रमाच्या कोवळया मनावर आघात झाला. परिस्थिती देखील बेताचीच होती. मामा व काकांनी चार भावंडांचा सांभाळ केला, लग्नाला पुढाकार देखील त्यांनीच घेतला. सागराची अथांगता, सुर्याचे तेज, चंद्राची शितलता, पाण्याची निर्मळता, वृक्षाची सावली, कस्तूरीचा सुगंध आणि अमृताची गोडी म्हणजे रमाई. आई ही व्यक्ति असते, त्यापेक्षाही एक वृत्ती असते. आश्वस्त करणारी शक्ति असते, तिच्यात पुण्यसंचय आणि अध्यात्मकता ठासून भरलेली असते. सोसण्याने माणूस खंगतण नाही. खचत नाही आणि कणखर बनतो. आपल्या सहनसीमेचा अंदाज आपल्यालाच नसतो. त्या दु:खाचा आवंढा गिळत होत्या पण कधीच हतबल, हताश, हिरमुसल्या नाहीत. इतक्या सोज्वळ व शांत स्वाभावाच्या रमाई होत्या. इतकी करारी बान्याची माता आजवर बघण्यात आलीच नाही. संवेदनाचा ओलावा हेच नात्याचं बलस्थान



असते, हे आपणांस रमाईत आढळते.भीम आम्हा शेषितांच्या मायेचा पदर अत्यंत हालाकीचे दिवस काढणारी माता रमाईने अनेक निधन जवळून बघितले. प्रत्येक निधनाने ती ही थोडी-थोडी मेल्यागत पण त्या खचल्या नाहीत, बेडर झाल्यात. मरण म्हणजे काय ? कळत नव्हते, त्या बाल वयात आई वडिलांचा मृत्यू. 1913 साली रामजी सुभेदारांचा मृत्यू, 1914 ते 1917 दरम्यान रमेशचा मृत्यू, बाबांच्या सावत्र आई जिजाबाईंचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. 1921 ला बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर व 1926 मध्ये राजरत्नदचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले, रमाई एकट्या पडल्या. घर चालविण्यासाठी तिने शेण गोवऱ्या, सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीम पर्यंत जात असत बॅरिस्टराची पत्नीय शेण वेचते म्हणून लोकं नावे ठेवतील, या भितीने त्या पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री 8 नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असंत, मुलांसाठी उपास करत असंत. बाबासाहेबांशिवाय दुसरा कूणीच पाठराखा नव्हता, त्यामुळेच त्यांना उपरोक्त उपक्रम करावाच लागला. पोटाची खडगी भरणे गरजेचं होतं. दोन वेळचं जेवन सुध्दा नशीबी नव्हतं. इतके कष्ट रमाईने सोसले. त्याची आच मुलांना सुध्दा लागू दिली नाही. 1923 साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले. व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखांशी अडचणींशी गरिबीशी भांडत होती, तरी पण त्या खचल्या नाहीत. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई! बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक बाबासाहेबांना परदेशी काही कामा निमित्त जायचे होते, पण रमाईला एकटी घरामध्ये कसे ठेवायचे म्हणून बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे मित्राकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. वराळे काका धारवाड मध्ये लहान मुलांचे वस्तीगृह चालवत असत. त्या वस्तीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एकदा अचानक दोन दिवस ती लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाईनी वराळे काकांना विचारले, “दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत खेळायला आवारात कां आली नाही”. त्यावेळी वराळे म्हणाले, ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वस्तीगृहाला जे अन्नधान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही.

## संपादकीय »

# असाही धडा

***जगभरात सध्या युद्धज्वर वाढला आहे. राष्ट्रांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा आणि त्यांना फुंकर घालून स्वतःचे ईप्सित साध्य करून घेणाऱ्या महाशक्तींमुळे संघर्षाचे प्रसंग सातत्याने उद्भवत आहेत.***

सध्या रशिया, युक्रेन, युरोप आणि इतर देशांत युद्धासाठी सैनिकांची कमतरता भासत आहे. आपल्याकडे सैन्य भरती म्हटली म्हणजे हजारो युवक येतात; पण फारच थोड्या युवकांचा सैन्यात नंबर लागतो. तरीही चीन किंवा पाकिस्तानविरुद्ध चालणाऱ्या प्रदीर्घ महायुद्धाकरिता मोठ्या संख्येने सैनिकांची गरज भासणार आहे. एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाच्या क्रांतीबरोबरच युद्धसंघर्षांमुळेही ओळखले जाते की काय, अशी सध्याची एकंदर स्थिती आहे. सुदैवाने भारत या सर्व परिस्थितीपासून दूर असला तरी शेजारी देशांचे उपद्व्याप आणि धोरणे पाहता भविष्यकाळात काय होईल, याची शाश्वती नाही. या पार्श्वभूमीवर भारताने आता सुरू असलेल्या युद्धसंघर्षांमधून सातत्यपूर्णतेने धडे घेत राहिले पाहिजे. युक्रेन-रशिया आणि इस्रायल-हमास!

गुजरातच्या राजकोटमध्ये एका गेमिंग झोनमध्ये लागलेल्या भीषण आगीत १२ बालकांसह २७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी संध्याकाळी घडली. तर शनिवारी रात्री उशीरा दिल्लीच्या विवेक विहार येथे असलेल्या बेबी केअर सेंटरला आग लागून त्यामध्ये ७ मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

# अनास्थेचे चिमुकले बळी !

केवळ काही तासांच्या अंतराने नियतीने तब्बल १९ चिमुकल्यांच्या जीवनावर घाला घातला आहे. हदय पिळवटून टाकणाऱ्या या दोन घटनांनी समाजमन सुन्न झालेले असतानाच केवळ पैशांच्या हव्यासापोटी चिमुकल्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या नराधमांवर कठोर कारवाई होणार का हा कळीचा प्रश्न आहे.राजकोटच्या प्रकरणात गेमिंग झोनचा मालक आणि तिथल्या मॅनेजरला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर निष्काळजीपणाचा आणि त्यामुळे मृत्यू झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकोटच्या गेमिंग झोनमध्ये लागलेल्या भीषण आगीची दखल गुजरात उच्च न्यायालयाने घेतली आहे. न्यायमूर्ती बिरेन वैष्णव आणि न्यायमूर्ती देवन देसाई यांच्या विशेष खंडपीठाने रविवारी सकाळी राज्य सरकार आणि महापालिकांकडून अशा गेमिंग झोन आणि मनोरंजनाच्या सुविधा कोणत्या कायद्याच्या तरतुदींनुसार चालविण्यास परवानगी



दिली आहे, याचा अहवाल मागविला आहे. राजकोट गेमिंग झोनने गुजरात कॉम्प्रिहेन्सिव्ह जनरल डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन्स्मधील त्रुटींचा फायदा घेतल्याचे दिसून येते. यामुळे बेकायदा गेमिंग झोन तयार करण्याचा मार्ग मोकळा झाला, असे सूचित करणाऱ्या बातम्यांची दखल घेत खंडपीठाने ही मानवनिर्मित आपत्ती असल्याचे खंडपीठाने म्हटले आहे आणि ते खरेच आहे. हे करमणूक झोन संबंधित अधिकाऱ्यांच्या आवश्यक मंजुरीशिवाय करण्यात आले आहेत. गुजरातमध्ये फायर एनओसीसह परवानग्या/एनओसी घेण्यावर मात करण्यासाठी आणि बांधकाम परवानगीसाठी, तात्पुरती संरचना तयार केली गेली आहे, असेही बोलले जात आहे. मुळात हे गेमिंग झोन वरवर पाहता केवळ टिन शेड आहेत. राजकोट शहराव्यतिरिक्त, अहमदाबाद शहरात सिंधू भवन रोड आणि एसपी रिंग रोडवर अशा प्रकारचे गेम झोन तयार झाले आहेत, ज्यामुळे सार्वजनिक सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे. प्रमाणपत्रच नसल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. याबद्दलची माहिती एसआयटी तपास अधिकाऱ्यांनी दिली आहे. नाहरकत प्रमाणपत्र नसतानाही तेथील जिल्हा प्रशासनातील अधिकारी अशाप्रकारे गेमिंग झोन्सला परवानगी देतातच कशी हा मूळ प्रश्न आहे. ही परिस्थिती केवळ गुजरातचीच नसून, देशातील इतर भागांतही असे अनधिकृत गेमिंग झोन चिमुकल्यांचे बळी घेण्यासाठी या उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये सरसावलेले असतील त्यांची शहानिशा संबंधित राज्य सरकार, जिल्हा प्रशासनाने करण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# टेंडरबाज मंत्र्यांचा प्रताप!

## माजी आरोग्य अधिकाऱ्याचं पत्र शेअर करत वडेट्टीवारांचा हल्लाबोल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे सध्या लंडन दौऱ्यावर गेले आहेत. मात्र त्यांच्या या लंडन दौऱ्यावरून विरोधक त्यांच्यावर टीका करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपा नेते आशिष शेलार यांनीदेखील उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. आशिष शेलार म्हणाले, उद्धव ठाकरे लंडनला जाऊन तिथल्या नालेसफाईची आकडेवारी देणार आहेत का? शेलार यांच्या या टीकेला शिवसेनेच्या ठाकरे गटातील आमदार सुनील राऊत यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. राऊत म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत १०० वेळा जगभ्रमंती केली. त्यांनी हे दौरे कशासाठी केले? ते परदेशात काय करायला गेले होते?**



महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळाचा आरोप आणि आर्थिक घोटाळ्याचा ठपका ठेवत पुणे जिल्हा परिषदेचे तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांना निलंबित करण्यात आलं आहे. मात्र या कारवाईनंतर भगवान पवार यांनी आरोग्य मंत्री तानाजी सावंतांवर आरोप करणारा लेटरबॉम्ब फोडला आहे. "सावंत यांनी मला कात्रज कार्यालयात बोलावून नियमबाह्य टेंडरची कामं करण्यास सांगितली होती, त्याचबरोबर इतर खरेदी प्रकरणात दबाव आणला होता", असा आरोप भगवान पवार यांनी केला आहे. भगवान पवार यांनी यासंदर्भात थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून तक्रार केली आहे. पवारांच्या या लेटरबॉम्बनंतर विरोधी पक्षांमधील नेते राज्य सरकारवर टीका करू लागले आहेत. तसेच त्यांनी थेट आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्यावर टीका केली आहे.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भगवान पवारांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेलं पत्र एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केलं आहे. या पत्रासह वडेट्टीवार यांनी लिहिलं आहे की, भ्रष्ट अधिकाऱ्यांचे लाड – प्रामाणिक अधिकाऱ्यांवर कारवाई? शिंदे सरकारच्या टेंडरबाज मंत्र्यांचा प्रताप! महायुती सरकारमध्ये फक्त टेंडर (निविदा) काढण्याची स्पर्धा असते. जे भ्रष्ट अधिकारी मंत्र्यांच्या आदेशाने नियमबाह्य काम करतात त्यांचे पूर्ण लाड पुरवले जातात. तर जे अधिकारी नियमबाह्य काम करत नाहीत त्यांचा महायुतीतील मुजोर आणि भ्रष्ट मंत्री कसा छळ करतात त्याचा मोठा पुरावा समोर आला आहे.

वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे की, पुणे महानगरपालिकेचे आरोग्य प्रमुख डॉ. भगवान पवार यांचं निलंबन करण्यात आलं आहे. त्यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना निलंबन मागे घ्यावं म्हणून पत्र लिहिलं आहे. मंत्र्यांनी त्यांना बोलवून वारंवार नियमबाह्य काम करण्यासाठी दबाव टाकला, ते काम केलं नाही म्हणून माझ्यावर निलंबनाची कारवाई केली गेली. याबाबत अनेक खुलासे करून मंत्र्यावर गंभीर आरोप केले आहेत.

### भ्रष्टाचारी सरकारने पापाचा कळस गाठला

काँग्रेस नेते वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे, आरोग्य खातं हे लोकांच्या आयुष्याशी निगडित आहे, रुग्णवाहिका घोटाळ्यापासून अनेक विषयांवर आम्ही सरकारकडे जाब विचारला पण सरकार तिथे कारवाई करत नाही. प्रामाणिक अधिकारी या भ्रष्ट सरकारचा खरा चेहरा जनतेसमोर आणत आहेत. भगवान पवार यांच्या पत्राची गंभीर दखल घेऊन मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी स्वतःच्या मंत्रिमंडळातील भ्रष्ट मंत्र्यांच्या टेंडरसाठी प्रामाणिक अधिकाऱ्यांचा बळी देऊ नये. ३० वर्ष प्रामाणिक सेवा देणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर स्वतःच्या न्यायासाठी पत्र लिहायची वेळ यावी ही घटना साक्ष देणारी आहे की राज्यात भ्रष्टाचारी सरकार आणि मंत्र्यांनी पापाचा कळस गाठला आहे.

# पाण्यासाठी तासगाव तालुक्यात शेतकरी आक्रमक

## पोलीसांशी झटापट, संतप्त सावळजच्या शेतकऱ्यांचे रस्ता रोको आंदोलन

। सांगली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विसापूर-पुणदी योजनेच्या पाण्यासाठी सावळज परिसरातील शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाट्यावर रास्ता रोको आंदोलन रविवारी केले. जलसंपदा अधिकारी आल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही असे म्हणत आंदोलकांनी ठिय्या मारला. पोलीसांनी आंदोलकांना ताब्यात घेत असताना झटापटही झाली.**



विसापूर – पुणदी योजनेचे सिद्धेवाडी तलावात सोडलेले पाणी अचानक बंद केल्यामुळे संतप्त झालेल्या सावळजच्या शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाटा येथे रविवारी रस्ता रोको आंदोलन केले. यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. जोपर्यंत संबंधित योजनेचे अधिकारी रास्ता रोकोच्या ठिकाणी येत नाहीत, तोपर्यंत या ठिकाणावरून उठणार नाही, असा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला.

पुणदी योजनेचे पाणी सावळजला सोडण्यात आले होते. मात्र एका नेत्याच्या सांगण्यावरून अवघ्या काही तासात हे पाणी बंद करण्यात आले. त्यामुळे सावळज भागातील शेतकरी संतप्त झाले आहेत. पाण्याच्या बाबतीत राजकारण केले जात आहे. अधिकारी नेत्यांच्या सांगण्यावरून पाणी बंद करत आहेत. पाण्याच्या बाबतीत केले जाणारे राजकारण खपवून घेणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

बंद केलेले पाणी तातडीने सुरू करावे, या मागणीसाठी सावळज शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाट्याजवळ सुमारे तासाभरापासून रास्ता रोको सुरू केला आहे. जोपर्यंत अधिकारी येत नाहीत, तोपर्यंत रस्त्यावरून हलणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

### पोलीस व आंदोलकांत झटापट

आंदोलक शेतकऱ्यांना पोलीसांनी बळाचा वापर करीत ताब्यात घेतले. यावेळी पोलीस व आंदोलक यांच्यात किरकोळ झटापटही झाली. आंदोलकांना तासगाव पोलीस ठाण्यात आणल्यानंतर कारवाईची सुरु करण्यात आल्याचे समजताच रोहित पाटील यांनीही पोलीस ठाण्यात येऊन ठिय्या मारला आहे.

### तासगाव पोलिसांचा अखेर रास्तारोको

जोपर्यंत पाणी मिळणार नाही तोपर्यंत रास्तारोको मागे घेणार नाही असा इशारा शेतकऱ्यांनी दिला होता. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे तासगाव पोलिसांनी अखेर रास्तारोको केलेल्या सर्व आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यामुळे बिरणवाडी-भिवघाट या मार्गावर गेल्या तीन तासांपासून रखडलेली वाहतूक आता सुरळीत सुरू झालीय.

# दिल्लीत बेबी केअर सेंटरला आग!

## 7 बालकांचा होरपळून मृत्यू; 12 तान्हुल्यांची सूटका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्लीच्या विवेक विहार येथे असलेल्या बेबी केअर सेंटरला आग लागली. यामध्ये 7 मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आग लागल्याची माहिती मिळताच फायर ब्रिगेडच्या तब्बल 16 गाड्या घटनास्थळी पोहोचले. फायर ब्रिगेडच्या टिमने 12 मुलांना रेस्क्यू करण्यात आलं. आता आगीवर नियंत्रण मिळवण्यात आलं आहे.**





पोलीस आणि अग्निशमन विभागाने 12 मुलांची सुटका केली असून त्यापैकी 7 जणांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 1 बालक व्हेंटिलेटरवर असून 5 मुले रुग्णालयात दाखल आहेत. मुलांना पूर्व दिल्लीच्या ॲडव्हान्स केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. बेबी केअर सेंटरमध्ये लागलेल्या आगीबाबत माहिती देताना अग्निशमन दलाच्या जवानांनी सांगितले की, रात्री 11.30 च्या सुमारास विवेक विहार परिसरातील ।T। जवळील ब्लॉक बी मध्ये बेबी केअर सेंटरला आग लागल्याची माहिती मिळाली. ज्यानंतर 9 अग्निशमन दलाच्या गाड्या रवाना झाल्या. पण आग मोठी असल्यामुळे 7 आणखी गाड्या पाठवण्यात आल्या. त्यांना रुग्णवाहिकेद्वारे जवळच्या गुप्ता नर्सिंग होम आणि पूर्व दिल्ली प्रगत नर्सिंग होममध्ये दाखल करण्यात आले. माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. बचाव पथकाने खिडकीतून नवजात बालकाची सुटका केली. अधिकाऱ्याने सांगितले की, बचाव मोहिमेदरम्यान टीमने इमारतीतून 12 नवजात बालकांची सुटका केली आहे. डीएफएस प्रमुख अतुल गर्ग यांनी दिलेल्या माहितीनुसार, आग आता नियंत्रणात आली आहे. आग लागण्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. या दुर्घटनेत मृत बालकांच्या नातेवाईकांनी एकच टाहो फोडला. या मुलांच्या आईच्या किंकाळ्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांचे मन हेलावले. रुणालयाने या सर्व प्रकारावर अजून कोणतीची प्रतिक्रिया दिलेली नाही. पोलीस आगीच्या घटनेचा तपास करत आहेत. अग्निशमन विभागाला आग लागल्याची माहिती मिळताच ते घटनास्थळी पोहचले. आग भडकली होती. रुग्णालयासह इतर इमारतींना पण आगीने घेरले. अग्निशमन विभागाने तात्काळ आग विझविण्याचे प्रयत्न केले. रात्री आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. पोलिस ही आग कशामुळे लागली याचा तपास घेत आहे. या रुग्णालयात अग्निरोधक यंत्रणा होती की नाही, याची चौकशी करण्यात येत आहे. या रुग्णालयात आपत्कालीन स्थिती बाहेर पडण्याचा मार्ग होता का? हे रुग्णालय रहिवाशी इमारतीत चालविण्यात येत होते का? यासह इतर अनेक बाबींची चौकशी करण्यात येणार आहे. गुजरातमधील गेम झोनमध्ये लागलेल्या आगीत 27 जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये 12 मुलांचा समावेश आहे.हा अपघात झाला तेव्हा गेमिंग झोनमध्ये बरेच लोक उपस्थित होते. कारण तो शनिवार होता आणि गेमिंग झोनमध्ये 99 रुपयांची तिकीट योजनाही सुरू होती. गेमिंग झोन ऑपरेटरच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचे समजते. याप्रकरणी पोलिसांनी 4 जणांना ताब्यातही घेतले आहे. यामध्ये टीआरपी गेम झोनचे मालक युवराज सिंग सोलंकी, त्याचा पार्टनर प्रकाश जैन, व्यवस्थापक नितीन जैन आणि आणखी एक व्यक्ती राहुल राठोड यांचा समावेश आहे.

### मालक डॉ नवीन याला अटक

डॉ नवीन खिची यांच्या बेबी केअर सेंटरला गुन्हेगारी निष्काळजीपणाचा इतिहास आहे. 2021 मध्ये, नवीन खिची आणि केअर- नवजात आणि बाल रुग्णालय, विवेक विहार फेज वन विरुद्ध आयपीसीच्या कलम 325, 506, 34 आणि बाल न्याय कायदा (मुलांचे संरक्षण आणि काळजी) कलम 75 अंतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला. या एफआयआरमध्ये नवीन खिची यांच्यावर नर्सिंग होमची नोंदणी न केल्याचा आणि केस हिस्ट्री खोटी केल्याचा आरोप करण्यात आला होता. हा एफआयआर हातरस येथील एका जोडप्याने दाखल केला आहे, ज्यांनी आपल्या नवजात मुलाला या रुग्णालयात दाखल केले होते. प्रत्यक्षात या दाम्पत्याच्या मुलाचा डावा हात हॉस्पिटलमध्ये मोडला होता.

# इस्रायलवर पुन्हा एकदा हमासचा हल्ला!

## गाझातून राजधानी तेल अवीववर क्षेपणास्त्र डागले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इस्रायलची राजधानी तेल अवीव शहरावर हमासकडून क्षेपणास्त्र डागण्यात आली आहेत. अचानक झालेल्या या हल्ल्यानंतर इस्रायलच्या मध्यभागी पुन्हा एकदा सायरनचे आवाज घुमत आहेत. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासकडून इस्रायलच्या हद्दीत घुसून हल्ला करण्यात आला होता. त्या हल्ल्यानंतर आता अनेक महिन्यांनी हमासने पुन्हा एकदा हल्ला केला आहे. हमासने हल्ल्याची जबाबदारी घेतली असल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.**

हमासचे सशस्त्र दल असलेल्या अल-कासम ब्रिगेडने हल्ल्याची जबाबदारी घेतली असून 'तेल अवीव'वर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्र डाकली असल्याचे त्यांनी सांगितले. इस्रायलने शहरात सायरन वाजवून नागरिकांना दक्ष राहण्यास सांगितले आहे. हमासकडून पुन्हा एकदा हल्ला होण्याची शक्यता असल्यामुळे इस्रायलने खबरदारीचे उपाय योजले आहेत.

अल-कासम ब्रिगेडने आपल्या टेलिग्राम चॅनलवर म्हटले की, झिओनिस्टने (ज्यू नागरिक) मानवतेचा नरसंहार केला. त्यांना आम्ही या हल्ल्यातून चोख उत्तर देत आहोत. हमासच्या अल-अक्सा टीव्हीनेही हा हल्ला गाझापट्टीतून करण्यात आला असल्याचे सांगितले आहे.



गाझाच्या दक्षिणेकडे असलेल्या राफा भागातून आठ क्षेपणास्त्र डागले गेले असल्याचे सांगितले जाते. यापैकी काही क्षेपणास्त्र इस्रायलच्या लष्कराकडून निकामी करण्यात आले, असे वृत्त बीबीसीने दिले आहे. या हल्ल्यात इस्रायलमधील किती नागरिक बळी पडले किंवा किती जणांना दुखापत झाली, याची माहिती अद्याप मिळू शकलेली नाही.

### इस्रायलची आंतरराष्ट्रीय स्तरावर कोंडी

इस्रायलचा दाव आहे की, त्याना राफामध्ये घुसलेल्या हमासच्या अतिरेक्यांना शोधून संपवायचे आहे आणि त्यांनी ओलीस ठेवलेल्या इस्रायली लोकांना मुक्त करायचे आहे. तथापि लष्करी कारवाईमुळे गाझातील नागरिकांसमोर मोठे संकट कोसळले असून इस्रायलची आंतरराष्ट्रीय स्तरावर कोंडीही झाली.

इस्रायलच्या दक्षिण भागातून गाझापट्टीत मानवी मदतीचे ट्रक आत गेल्यानंतर इस्रायलवर हा हल्ला झाला आहे. गेल्या काही काळापासून राफा सीमेवर बंदी घालण्यात आली होती. मात्र नव्या करारानुसार ही बंदी उठवली गेली. त्यानंतर गाझामध्ये मानवी मदत पोहोचण्यास सुरुवात झाली आहे. सात महिन्यांहून अधिक काळ इस्रायल आणि हमास यांच्यात गाझापट्टीत संघर्ष सुरू आहे. गाझामध्ये मदत पाठविण्यात यावी, यासाठी इस्रायलवर अनेक देशांचा दबाव होता. गेल्या काही महिन्यांपासून युद्ध सुरू असल्यामुळे गाझात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच तिथे अन्न व इतर जीवनावश्यक वस्तूंची कमतरता भासत आहे.


# अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली

'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे. आरती आई झाली आहे, तिने एका महिन्याआधी गोंडस बाळाला जन्म दिला आहे. आरती ४१ व्या वर्षी आई झाली आहे. आरतीने ४ मार्च रोजी मुलाला जन्म दिला असून त्याचं नावही सांगितलं आहे. आरतीच्या पतीचं नाव विशारद बीडासी असून तो चार्टर्ड अकाउंटंट आहे. आरतीने मुलाचं नाव युवान ठेवलं आहे. तिने ती गरोदर असल्याची बातमी का लपवून ठेवली होती, याबद्दल 'हिंदुस्थान टाइम्स' शी बोलताना सांगितलं. "मला वाटत होतं की जेव्हा मला बाळाबद्दल सांगावसं वाटेल तेव्हाच मी सांगेन. आता मला सांगावसं वाटतंय. कारण माझ्या बाळाचा जन्म होऊन एक महिना झाला आहे," असं ती म्हणाली. तसेच सुरुवातीचे काही महिने आपण कपड्यांमुळे प्रेग्नेन्सी लपवली, असं तिने सांगितलं.आरती आणि तिच्या पतीने २०१९ मध्ये अरेंज मॅरेज केलं होतं. लग्नानंतर ते दोघे ऑस्ट्रेलियाला गेले आणि करोना आल्यामुळे तिथेच अडकले. "दूर राहणं तणावपूर्ण होतं, त्या परिस्थिती तुम्ही वेगवेगळ्या भावनांमधून जात असता त्यामुळे गर्भधारणा करू शकत नाही. मी नवीन ठिकाण आणि नवीन लोकांशी जुळवून घेण्यासाठी धडपडत होते, माझ्या शरीरातही खूप बदल होत होते," असं ती म्हणाली. तसेच ४१ व्या वर्षी बाळाला जन्म देणं हे विशीत किंवा तिशीत जन्म देण्याइतकं सोपं नाही, असंही तिने नमूद केलं."आधी माझा गर्भपात झाला होता, त्यामुळे यावेळी मी गर्भधारणेबद्दल न सांगायचं ठरवलं. मला उपचार घ्यावे लागले, तेव्हा मी गरोदर राहिले. बरेच लोक बोलतात ही अभिनेत्री आहे, हिच्याकडे पैसा आहे, त्यामुळे काही अडचण नाही. पण असं नसतं. हे उपचार आरोग्यावर परिणाम करतात. माझं वजन विचित्र पद्धतीने वाढलं, मला औषधांचे दुष्परिणाम जाणवत होते. औषधं घेऊनही मी गरोदर झाले नाही, शेवटी मी सर्व आशा सोडून दिल्या होत्या. पण नंतर मी गरोदर राहिले," असं आरती म्हणाली.'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे.

## माधुरी दीक्षितच्या मनमोहक अदा

९० च्या दशकात माधुरी दीक्षितने आपल्या अभिनयासह दमदार नृत्याने सगळ्यांवर मोहिनी घातली होती. या मराठमोळ्या अभिनेत्रीने बॉलीवूडमध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण करून चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवलं. तिला बॉलीवूडची 'धकधक गर्ल' म्हणून सुद्धा ओळखलं जातं. सध्या माधुरीने इन्स्टाग्रामवर शेअर केलेला असाच एक व्हिडीओ चर्चेत आला आहे. इन्स्टाग्राम रील्सवर अनेक गाणी व्हायरल होत असतात. सध्या आशा भोसले यांचं १९८३ मध्ये प्रदर्शित झालेलं "सलोना सा सजन है...और मैं हूं" या गाण्याची नेटकऱ्यांना भुरळ पडली आहे. अगदी माधुरीला सुद्धा या गाण्यावर थिरकण्याचा मोह आवरला नाही. अभिनेत्रीने नुकताच या गाण्यावर ब्लॅक अँड व्हाइट व्हिडीओ शेअर केला आहे.आशा भोसलेंच्या या जवळपास ४० वर्षे जुन्या गाण्यावर अभिनेत्रीचा मनमोहक अंदाज पाहायला मिळत आहे. माधुरीने या व्हिडीओमध्ये इंडो-वेस्टर्न लूक करत साडी नेसल्याचं पाहायला मिळत आहे. तिच्या अदाकारीची केवळ नेटकऱ्यांनाच नव्हे तर मराठी अभिनेत्रींना देखील भुरळ पडली आहे.माधुरीच्या व्हिडीओवर क्रांती रेडकरने "ओह माय गॉड तू खरंच बेस्ट आहेस" अशी कमेंट करत लक्ष वेधून घेतलं आहे. तर अमृता खानविलकरने या व्हिडीओवर कमेंट करत "उफ...ग्रेस" असं म्हटलं आहे.

## कुठे आहे मालिनी शर्मा?



डिनो मोरिया, बिपाशा बासूची भयपटातील रोमँटिक गाणी खूप झाली होती. या 'मैं तुम्हें

मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. या गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप चर्चा सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, जिचा बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते. विवाहित डिनो मालिनीशी लग्न करण्यास नकार देतो आणि ती गोळी मारून आत्महत्या करते. मग ती भुताच्या रुपात त्याला व बिपाशाला त्रास देते अशी चित्रपटाची कथा होती. या चित्रपटानंतर तिच्या अभिनयाची व सौंदर्याचीही खूप चर्चा झाली.मालिनीने आपल्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून केली होती. तिने करिअरमध्ये अनेक टीव्ही शो आणि चित्रपटांमध्ये काम केलं. याशिवाय ती बॉम्बे वायकिंगच्या 'क्या सूरत है' या गाण्यातही दिसली होती. इतकंच नाही तर अभिनेत्रीने मिका सिंगच्या 'सावन में लग गई आग' या गाण्यात काम केलं होतं.मालिनी शर्माच्या वैयक्तिक आयुष्याविषयी बोलायचं झाल्यास तिने प्रियांशू चॅटर्जीशी लग्न केलं, पण त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. चार वर्षानंतर त्यांचा घटस्फोट झाला. आता मालिनी शर्मा कुठे आणि काय करते याबद्दल माहिती उपलब्ध नाही.डिनो मोरिया, बिपाशा बासूची मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. या भयपटातील रोमँटिक गाणी खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप चर्चा झाली होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, जिचा 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते.

## जॅकी श्रॉफ यांचा व्हिडीओ होतोय तुफान व्हायरल

आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर फोटो काढले. पण यावेळी त्यांनी चाहत्यांना दिलेल्या वागणुकीने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.या व्हिडीओत, जॅकी श्रॉफ फोटो काढण्यात आलेल्या चाहत्याला डोक्यात मारताना दिसत आहेत. तसेच इतरांना दम देताना पाहायला मिळत आहेत. जॅकी श्रॉफ यांनी चाहत्यांना दिलेल्या या वागणुकीवरून नेटकरी भडकले आहेत.एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "त्याला मारलं का? वेडेत आहेत का?" तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे खूप चुकीचं आहे. तुम्ही कोणालाही मारू शकत नाही. चाहते तुमचे मित्र किंवा नातेवाईक नाहीत, ज्यांच्याबरोबर तुम्ही मस्ती कराल." तसेच तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हात लावला तर काय झालं? एवढा गर्व नाही पाहिजे." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे चुकीचं आहे. सामान्य माणसांना हे आदर देत नाहीत."सध्या जॅकी श्रॉफ यांच्या या व्हिडीओची चांगलीच चर्चा सुरू आहे. पण काही नेटकरी त्यांना आलेले जॅकी श्रॉफ यांचे चांगले अनुभव शेअर करत आहेत.आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर फोटो काढले. पण

## रकुल प्रित सिंहने केली खास पोस्ट



लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांचा आज वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अभिनेत्री रकुल प्रित सिंगनेही धिरज यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिने तिच्या व जॅकीच्या लग्नसोहळ्यातील एक खास फोटो शेअर करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रितेश देशमुखचे भाऊ धिरज यांची पत्नी दिपशिखा ही रकुल प्रितची सख्खी नणंद आहे. रकुल व जॅकी यांचं फेब्रुवारी महिन्यात गोव्यात लग्न झालं. लग्नाच्या कार्यक्रमातील एक फोटो रकुलने शेअर केला आहे. या फोटोत रकुल व धिरज देशमुख डान्स करताना दिसत आहेत. 'वाढदिवसाच्या शुभेच्छा, येणारं वर्ष आनंदाचं जावो आणि या वर्षात तुम्हाला हवं ते सर्व मिळो,' असं रकुलने या फोटोत धिरज देशमुखांना टॅग करत लिहिलं.रकुल व जॅकीचं लग्न २१ फेब्रुवारी रोजी गोव्यात झालं. मेहुण्याच्या लग्नासाठी धिरज देशमुख गोव्याला गेले होते. त्यांची पत्नी दिपशिखा व मुलं सर्वजण या लग्नासाठी काही दिवस गोव्यात होते.

# कोरबो-लोरबो जीतबो!

## कोलकाता नाईट रायडर्सने तिसऱ्यांदा चषकावर कोरलं नाव

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**कोलकाता नाईट रायडर्स आयपीएल २०२४ चा चॅम्पियन संघ ठरला आहे. सनरायझर्स हैदराबादचा ८ विकेट्सने पराभव करत मोठा विजय नोंदवला. हैदराबादने केकेआरला विजयासाठी अवघ्या ११४ धावांचे सोपे आव्हान दिले होते. कोलकाता संघाने अवघ्या षटकांत हे आव्हान सहज गाठले. व्यंकटेश अय्यर आणि रहमानउल्ला गुरबाजच्या ९१ धावांच्या भागीदारीच्या जोरावर झटपट धावा केल्या. व्यंकटेश अय्यरने २६ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकार लगावत ५२ धावा केल्या तर आंद्रे रसेलने ३ विकेट्स घेत चेंडूने चांगली कामगिरी केली. तर केकेआरच्या गोलंदाजांनी अंतिम सामन्यात चेंडूने हाहाकार केला. संघ जिंकताना पाहून गौतम गंभीरच्या चेहऱ्यावरील हसू पाहण्याची संधीही सर्व चाहत्यांनी मिळाली.**



केकेआरने १० वर्षांनंतर पुन्हा ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. कोलकाताने तिसऱ्यांदा आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे. यापूर्वी गौतम गंभीरच्या नेतृत्वाखाली केकेआरने २०१२ आणि २०१४ मध्ये ट्रॉफी जिंकली होती. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ११३ धावा केल्या. प्रत्युत्तरात कोलकाताने सहज लक्ष्य गाठले.अंतिम सामन्यात केकेआर संघाच्या गोलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीनंतर संघाच्या फलंदाजांकडून अशाच खेळाची अपेक्षा होती. कोलकाता नाईट रायडर्स संघाची सुरुवात चांगली झाली नाही ज्यात त्यांनी ११ धावांवर सुनील नारायणच्या रूपात पहिली विकेट गमावली, जो केवळ ६ धावा करत पॅट कमिन्सचा बळी ठरला. यानंतर फलंदाजीला आलेल्या व्यंकटेश अय्यरने रहमानउल्ला गुरबाजसह आक्रमक खेळी करत संघाची धावसंख्या पहिल्या ६ षटकांत १ गडी गमावून ७२ धावांवर नेली. या सामन्यात दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ४५ चेंडूत ९१ धावांची भागीदारी करून सामना पूर्णपणे एकतर्फी केला. गुरबाजच्या बॅटमधून ३९ धावांची खेळी पाहायला मिळाली. तर व्यंकटेश अय्यर या सामन्यात संघाला विजेतेपद मिळवून देऊन परतला ज्यात त्याने ५२ धावांची उत्कृष्ट खेळी केली. हैदराबादसाठी या सामन्यात पॅट कमिन्स आणि शाहबाज अहमद यांनी गोलंदाजीत १-१ विकेट घेतली.तत्पूर्वी नाणेफेक जिंकून सनरायझर्स हैदराबाद संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, जो पूर्णपणे चुकीचा ठरला, पहिल्याच षटकात मिचेल स्टार्कने अभिषेक शर्माच्या रूपाने संघाला मोठा धक्का बसला. पहिल्या ६ षटकांचा खेळ संपेपर्यंत हैदराबाद संघाने ३ महत्त्वाचे विकेट गमावले होते. यानंतर, धावसंख्या ६२ होईपर्यंत निम्मा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. करणे त्यांच्यासाठी अजिबात सोपे नव्हते. सततच्या दबावामुळे केकेआरच्या गोलंदाजांनी हैदराबादचा डाव केवळ ११३ धावांवर रोखला. केकेआरकडून गोलंदाजीत आंद्रे रसेलने सर्वाधिक ३ विकेट घेतले, तर मिचेल स्टार्क आणि हर्षित राणा यांनी २-२ विकेट्स घेतल्या, तर वैभव अरोरा, सुनील नारायण आणि वरुण चक्रवर्ती यांनी १-१ विकेट घेतली.

### अंतिम सामना एकतर्फी


हैदराबादचा एकही फलंदाज फार काळ मैदानात टिकून मोठी खेळी करू शकला नाही, आयपीएलच्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाची ही सर्वात कमी धावसंख्या होती. स्टार्कने गोलंदाजीत आपली कामगिरी चोख बजावत तीन षटकांत १४ धावा देऊन दोन विकेट घेतले. पण अंतिम सामन्यात पॅट कमिन्सचे नेतृत्व कमी पडले. केकेआरकडून उत्कृष्ट गोलंदाजीचे प्रदर्शन पाहायला मिळाले. आंद्रे रसेलने २.३ षटकांत १९ धावांत तीन विकेट घेतले, तर हर्षित राणाने चार षटकांत एका मेडनसह २४ धावांत दोन विकेट घेतले. केकेआरने 2024 च्या हंगामात सुरुवातीपासूनच शानदार क्रिकेट खेळले आहे आणि आता अंतिम सामना एकतर्फी जिंकत त्यांनी आपल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीचा पुरावा दिला.


# काव्या मारन पराभवाने झाली भावुक

## कॅमेऱ्याकडे पाठ करत पुसले अश्रू, VIDEO व्हायरल

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**IPL 2024 मध्ये 26 मे रोजी झालेल्या अंतिम सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने सनरायझर्स हैदराबादचा ८ गडी राखून पराभव केला आणि तिसऱ्यांदा ट्रॉफीवर कब्जा केला. अंतिम सामन्यात केकेआरने दमदार कामगिरी केली. या सामन्यात केकेआरने एकतर्फी खेळ करत हैदराबादचा लाजिरवाणा पराभव केला. सामन्याच्या सुरूवातीपासूनच कोलकाता संगाने सामन्यावर आपली पकड मजबूत केली आणि हैदराबाद संघाला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी नाही दिली.**





कोलकाताकडून झालेल्या दारूण पराभवानंतर, काव्या मारनचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यामध्ये ती स्टँडवर उभी राहून खूप भावूक झालेली दिसली आणि नंतर रडत डोळे पुसतानाही दिसली. आयपीएल २०२४ च्या फायनलपर्यंतच्या अप्रतिम प्रवासानंतर, हैदराबादला आयपीएल फायनलमध्ये कोलकाताकडून आठ गडी राखून पराभव पत्करावा लागला. हैदराबादची मालकीण काव्या मारनही हा पराभव पाहून रडताना दिसली तिच्या डोळ्यातून अश्रू आले. पण काव्या तिचे हे अश्रू लपवले आणि काव्या मागे वळून तिच्या डोळ्यात आलेले अश्रू पुसताना दिसली आणि नंतर पुन्हा वळून आपल्या संघाचे प्रोत्साहन वाढवताना दिसली. तिचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. केकेआरकडून आंद्रे रसेल (१९ धावांत ३ विकेट) सह सर्व गोलंदाजांनी दमदार कामगिरी केली आणि व्यंकटेश अय्यरचे (नाबाद ५२) शानदार अर्धशतक केले. ज्यामुळे केकेआरसाठी हा विजय अधिक सोपा ठरला. ५७ चेंडू शिल्लक असताना तिसऱ्यांदा केकेआरने आयपीएलचे विजेतेपद पटकावले. हैदराबादला १८.३ षटकांत ११३ धावांत गुंडाळल्यानंतर, कोलकाताने अवघ्या १०.३ षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात ११४ धावा करून एकतर्फी विजय मिळवला. व्यंकटेश अय्यरने केवळ २६ चेंडूत नाबाद ५२ धावा करताना चार चौकार आणि तीन षटकार लगावले. रहमानउल्ला गुरबाजने ३२ चेंडूत ३९ धावा करताना पाच चौकार आणि दोन षटकार ठोकले. अय्यर आणि रहमानउल्ला गुरबाज यांनी दुसऱ्या विकेटसाठी ९१ धावांची सामना जिंकणारी भागीदारी केली.

### शाहरुख खान आजारी होता

केकेआर संघाचा मालक शाहरुख खान आजारी होता. नुकतेच त्याला रुग्णालयातही दाखल करावे लागले होते. यानंतरही तो आपल्या खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी फायनल सामन्यासाठी चेपॉक स्टेडियममध्ये पोहोचला. कोलकातानेही आपल्या मालकाला निराश केले नाही आणि ट्रॉफी जिंकल्यानंतर सेलिब्रेशन केले. सामना संपल्यानंतर शाहरुख खानने गौतम गंभीरला मिठी मारली आणि त्याच्या कपाळावर चुंबनी घेतली. यादरम्यान तो सपोर्ट स्टाफ आणि खेळाडूंना भेटताना दिसला. त्याने सर्व खेळाडूंना मिठी मारली.कोलकाताने सनरायझर्स हैदराबादचा आठ गडी राखून पराभव केला. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील संघ तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावण्यात यशस्वी ठरला. लक्ष्याचा पाठलाग करताना कोलकाताने व्यंकटेश अय्यर आणि गुरबाज अहमद यांच्या अर्धशतकी भागीदारीमुळे सामना जिंकला. रविवारी चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात कोलकाताने बॉल आणि बॅट दोन्हीसह चमकदार कामगिरी केली आणि पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील संघाला कधीही वरचढ होऊ दिले नाही.